CMYK


**धनंजय मुंडे हे अजित पवारांचेच भाऊ, काकांच्या पाठीत सुरा खुपसणारे** >> पान 2

**सुषमा अंधारे यांची पाचोरा येथे प्रचारसभेत सत्ताधाऱ्यांवर तीव्र टीका** >> पान 3

**गावोगावी सिद्धार्थ खरात यांचे जल्लोषात स्वागत** >> पान 4


**सुविचार**
मनाची शांती सर्वांत मोठं धन आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034





मिस टीन युनिव्हर्स स्पर्धेत भारताचं वर्चस्व, ओडिशाच्या तृष्णा रायनं जिंकला ताज... आतील पान



■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 96 ■ गुरूवार, दि. 14 नोव्हेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


## बारामतीत अजित पवारांच्या बॅगा तपासल्या, चकल्या सापडल्या; अजितदादा म्हणाले, खा खा बाबा...

दैनिक आपला विदर्भ

**बारामती/प्रतिनिधी :** राज्यात विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. या निवडणुकीत नेतेमंडळी एकमेकांवर सडकून टीका करताना दिसत आहेत. मतदानाचा दिवस जसा-जसा जवळ येत आहे, तसा तसा प्रचाराला वेग येत आहे. राज्यातील प्रमुख नेते विविध जिल्ह्यात जाऊन जाहीर सभा घेत आहेत. यादरम्यान राजकीय नेत्यांसोबत असणाऱ्या बॅगेची तपासणी देखील केली जात आहे. आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांची बाराम ती येथे हेलिकॉप्टर आणि बॅगची तपासणी करण्यात आली.

बारामतीत निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी अजित पवारांच्या हॅलिकॉफ्टरची तापासणी केली. अजित पवारांच्या सर्व बॅगा तपासण्यात आल्या. अजित पवारांनी फोनवर बोलत असातान स्वत: बॅगा तपासण्यासाठी दिल्या. यावेळी एका बॅगेत चकल्या होत्या. बॅगेत चकल्या हातात घेऊन खा-खा बाबा...सगळ्या बॅगा तपास...त्या डब्यात पैसे आहेत का चेक कर...असं अजित पवार अधिकाऱ्यांना बोलताना दिसले.

उद्धव ठाकरेंच्या दोनदा बॅगा तपासल्या-

लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेल्या माजी मुख्यमंत्री आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची विमानतळावर बॅगेची तपासणी करण्यात आली. दोन दिवसांपूर्वी वणी येथेही असाच प्रकार झाला होता. यावर उद्धव ठाकरे यांनी स्वत: व्हिडीओ करत कर्मचाऱ्यांची उलट तपासणी केली. तो व्हिडिओ त्यांनी समाज माध्यमावर टाकला आहे. लातूर जिल्ह्यातील औसा विधानसभा मतदारसंघात उद्धव ठाकरेंची जाहीर सभा होती. या सभेतही बॅग तपासणीवर त्यांनी जोरदार टीका केली. माझ्या बॅग तपासा... पण पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची बॅग का तपासत नाहीत? असा प्रश्न उद्धव ठाकरेंनी जाहीर सभेत विचारला.


उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बॅगची देखील तपासणी झाली. पण, त्यांनी ना कोणता व्हिडिओ काढला, ना कोणती आगपाखड केली असं म्हणत भाजप पक्षाकडून ठाकरेंवर टीका केली आहे. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बॅगचीही तपासणी झाल्याचा व्हिडीओ भाजपकडून ट्विट करण्यात आला आहे. ५ नोव्हेंबर रोजी कोल्हापूर विमानतळावर देवेंद्र फडणवीस यांच्या बॅगची तपासणी करण्यात आली होती. यावेळीचा व्हिडीओ भाजपकडून ट्विट करण्यात आला आहे.

### मतदान करा आणि मिळवा पेट्रोल फ्री

**पुणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ ला अवघे काही दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राज्यात एकाच टप्प्यात निवडणूक होणार असून २० नोव्हेंबरला म तदान पार पडणार आहे. पुण्यात मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी काही संघटनांनी पुढाकार घेतला आहे.मतदान केल्यानंतर पेट्रोल पंपावर १ लिटर इंजिन ऑइल खरेदी केल्यानंतर ५० रुपयांचे पेट्रोल आणि हॉटेल मधील जेवणाच्या बिलात १० टक्के सूट देण्यात येणार आहे. लोकशाहीच्या उत्सवात मतदारांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे असे आवाहन संघटनांच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आले आहे.

# सीआयएसएफच्या महिला बटालियनला केंद्र सरकारची मंजुरी

नवी दिल्ली : केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाची (सीआयएसएफ) पहिल्या महिला तुकडीचे गठन करण्यास केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. ५३ व्या सीआयएसएफ दिनानिमित्त केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या निर्देशानुसार दलात महिला बटालियन तयार करण्याच्या प्रस्तावावर काम सुरू करण्यात आले होते.



केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी सांगितले की, सरकारने केंद्रीय सीआयएसएफच्या पहिल्या महिला बटालियनच्या स्थापनेला मान्यता दिली आहे. आपल्या एक्स पोस्टमध्ये ते म्हणाले, राष्ट्र उभारणीच्या प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढवण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने ठोस पावले उचलत मोदी सरकारने सीआयएसएफची पहिली महिला बटालियन स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. महिला बटालियन विशेष दल म्हणून उभारली जाणार आहे, ती देशातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधा, जसे की विमानतळ आणि मेट्रो रेल्वे सुरक्षित करण्याची आणि कमांडोजच्या रूपात व्हिआयपी सुरक्षा प्रदान करण्याची जबाबदारी घेईल. या निर्णयामुळे अधिकाधिक महिलांच्या राष्ट्ररक्षणाच्या महत्त्वाच्या कार्यात सहभागी होण्याची आकांक्षा पूर्ण होणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.



## महिलांना पंधराशे रुपये देण्याऐवजी शेतकऱ्यांच्या पिकाला भाव द्या : शर्मिला ठाकरे



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** गेल्या ७५ वर्षात मनसे वगळता सर्वच मोठ्या राजकीय पक्षांनी सत्ता उपभोगली आहे. पण, हे पक्ष पायाभूत सुविधा देऊ शकलेले नाहीत, अशी टीका शर्मिला ठाकरे यांनी मंगळवारी ठाण्यातील मनसेच्या चौक सभेत बोलताना केली. महिलांना १५०० रुपये देण्याऐवजी शेतकऱ्यांच्या पिकाला भाव द्या आणि हाताला काम द्या, जेणेकरून महिलांना पैसे देण्याची गरज भासणार नाही, असेही त्या म्हणाल्या.

ठाणे शहर मतदारसंघातील म नसेचे उमेदवार अविनाश जाधव यांच्या प्रचारासाठी शर्मिला ठाकरे यांनी गोकुळनगर भागात चौक सभा घेतली. या सभेत बोलताना त्यांनी सर्वच राजकीय पक्षांवर टीका केली. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाली. या ७५ वर्षात सर्वच राजकीय पक्षांनी सत्ता उपभोगली आहे. काही पक्षांनी देशात, राज्यात तर काही पक्षांनी पालिकेत सत्ता उपभोगली आहे. परंतु हे पक्ष पायाभूत सुविधा देऊ शकलेले नाहीत, अशी टीका शर्मिला ठाकरे यांनी केली.

राज्याची हद्द सोडली तर सर्व रस्ते चांगले दिसून येतात. त्यामुळे आमच्या आमदार खासदारांना इतकी कसली भूक आहे की चांगले रस्ते बनवणार नाहीत, अशी टीकाही त्यांनी केली. मुंबई गोवा म हामार्गावर दरवर्षी कित्येक लोक मरतात. १६ वर्ष होऊन रस्ता होऊ शकलेला. आपला ज्ञान चंद्रावर पण सोळा वर्षात पोहोचला पण, मुंबई गोवा रस्ता होऊ शकलेला नाही. आपली टेक्नॉलॉजी चंद्रावर जाण्याएवढी मजबूत आहे. परंतु हा रस्ता आपला मंगळ ग्रहावरचा असल्यामुळे तो बनू शकत नाही, असा खोचक टीकाही त्यांनी केली.

आपल्याला सुरक्षा पुरवणाऱ्या पोलिसांच्या वसाहतीतील घरांच्या छप्पर पडत आहे. राज्य सरकारने जर मनावर आणलं तर त्यांना इमारती बांधून चांगली घरे देऊ शकतात, असेही त्या म्हणाल्या. महिलांना १५०० रुपये देण्याऐवजी शेतकऱ्यांच्या पिकाला भाव द्या आणि हाताला काम द्या, जेणेकरून महिलांना पैसे देण्याची गरज भासणार नाही, असेही त्या म्हणाल्या. महिलांना पंधराशे रुपये मिळाल्यामुळे त्या खुश आहेत. १५०० रुपये देत असले तरी ते महागाई वाढवून महिलांच्या घरखर्चातले ३ हजार रुपये काढून घेतात, हे महिलांना समजेपर्यंत निवडणूक होऊन गेलेली असते, अशी टीकाही त्यांनी केली.

## अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्याच्या मदतीला टपाली मतदान सुविधा

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाने अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी व निवडणूक कामात असलेले कर्मचारी मतदानाच्या दिवशी कर्तव्यावर कार्यरत असल्यामुळे मतदान करु शकत नाहीत. त्यामुळे त्यांना टपाली मतदान करण्याची सुविधा सुलभता केंद्रावर उपलबध करुन देण्यात आली आहे.

या प्रक्रियेतील अंतिम टप्पा सध्या सुरू असून यासाठी सर्व विधानसभा क्षेत्रामध्ये टपाल मतदानाची जबाबदारी असणाऱ्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची लगबग सुरू आहे. वेळेत आणि दिलेल्या तिथीवर ही प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक असल्यामुळे आता ऑफलाईन आणि ऑनलाईन दोन्ही पद्धतीचा वापर केला जात आहे.



टपाली मतदान करण्यासाठी अधिकारी- कर्मचाऱ्यांना फार्म नं. १२ भरुन यापूर्वीच दिला आहे. यासोबत मतदान कार्ड, झेरॉक्स जोडून फॉर्म भरावा लागतो. तो फार्म महाइलेक्शनवर अपलोड करुन त्यानंतर विवरणपत्र ४ तयार होते. त्यानंतर ते पोस्टल बॅलेट टपाली कक्षात जमा करण्यात येते.

नांदेड जिल्हयातील लोकसभा पोटनिवडणूक व नऊ विधानसभा मतदार संघातील अत्यावश्यक सेवेतील अधिकारी, कर्मचाऱ्याचा फार्म नं. १२ पहिल्या ट्रेनिंग मध्ये भरुन घेण्यात आला आहे. नांदेड उत्तर विधानसभा मतदार सघासाठी दिनांक १२ ते १३ नोव्हेंबर या कालावधीत सकाळी १० ते ५ या कालावधीत केंद्रीय विद्यालयात, तर त्या त्या ठिकाणी दुसऱ्या ट्रेनिंग मध्ये टपाली मतदान करुन घेण्यात येणार आहे. नांदेड उत्तर मतदार संघासाठी १४ ते १८ नोव्हेंबर रोजी नियोजन भवनला सकाळी १० ते ५ या कालावधीत टपाली मतदान करुन घेण्यात येणार आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी ललितकुमार वऱ्हाडे यांनी दिली आहे.

## बंजारा महंत सुनील महाराज यांचा योगी आदित्यनाथ यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश

दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा राजीनामा दिलेले पोहरादेवी येथील महंत सुनील महाराज राठोड यांचा योगी आदित्यनाथ यांच्या उपस्थितीमध्ये आज भाजपामध्ये जाहीर प्रवेश झाला. महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आज योगी आदित्यनाथ यांनी पोहरादेवी येथे शंखनाद सभेला संबोधित केले.



पोहरादेवीचा ज्या गतीने विकास झाला त्याच गतीने वाशीम जिल्ह्याचा विकास होण्यासाठी मी भाजपा प्रवेश करीत आहे असे सुनिल महाराज म्हणाले. गत दहा महिन्यात उद्धव ठाकरे यांनी दहा मिनिटे सुद्धा वेळ दिला नाही मात्र देशाचे हिंदू धर्म रक्षीते थोर महंत म्हणून ज्यांची ख्याती आहे. अशा देशाच्या महंताच्या हस्ते मला भारतीय जनता पक्षात प्रवेश मिळाला ही माझ्यासाठी आणि सकल बंजारा बांधवांसाठी आनंदाची आणि अभिमानास्पद बाब आहे अशी प्रतिक्रिया महंत सुनील महाराज राठोड यांनी दिली आहे.

## संत तुकारामांच्या अभंगगाथेवरील 'आनंदडोह' चित्रपटाची घोषणा


दैनिक आपला विदर्भ

### दिग्पाल लांजेकर करणार दिग्दर्शन

**मुंबई/प्रतिनिधी :** अमृताशी पैजा जिंकणाऱ्या मराठी भाषेतील संत विचारावर महाराष्ट्र समृध्द झाला आहे. या संतांनी अभंग-ेक-ओव्या याच्या रचनांमधून अभिजात साहित्याचा अलौकिक ठेवा मराठी भाषेला दिला. अध्यात्म, रुढी-परंपरांकडे पाहण्याची एक निर्मळ दृष्टीही बहाल केली आहे. आजच्या काळात या अपार दृष्टीची आपल्या सर्वांना नितांत आवश्यकता आहे. 'शिवराज अष्टकाच्या' माध्यमातून लेखक-दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज अन त्यांच्या शूर शिलेदार आणि म ावळ्यांचा इतिहास जागतिक सिनेम ांच्या पातळीवर नेऊन ठेवलाय. 'शिवराज अष्टक' नंतर आता संत साहित्याचे समृद्ध संचित घराघरांत पोहोचावण्यासाठी दिग्पाल लांजेकर यांनी आता एक पाऊल पुढं टाकलं आहे.

'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' हा चित्रपट बनवल्यानंतर आता संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या अभंग गाथेवरील 'आनंदडोह' या नव्या चित्रपटाची घोषणा लांजेकर यांनी केली आहे. या चित्रपटाचे आकर्षक मोशन पोस्टर नुकतंच रिलीज करण्यात आलं आहे. 'साईराम एंटरप्राईजेस' निर्मित, योगेश सोमण लिखित आणि दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित 'आनंदडोह' हा संतपट २०२५ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अविनाश शिंदे यांनी या चित्रपटाची निर्मितीची जबाबदारी उचलली आहे. मुक्ता बर्वे, योगेश सोमण, अजय पूरकर, समीर धर्माधिकारी, आदिनाथ कोठारे हे कलाकार या चित्रपटात दिसणार आहेत.







जगद्गुरु तुकाराम महाराजांची अभंगगाथा हा अभिजात मराठी साहित्यातील मैल्यावान ठेवा आहे. तत्कालीन समाजव्यवस्थेशी टक्कर देताना त्यांनी बहुजन समाजाला ज्ञानमार्ग दाखवणारे अनेक अभंग रचले. त्यांच्या ३००० हून अधिक अभंगातून आजही आपल्याला जगण्याची प्रेरणा आणि योग्य दिशा मिळत असते. या अभंगगाथेतल्या तत्वज्ञानाला तत्कालीन रूढीवादी तथाकथित धर्म पंडितांनी विरोध केला. संत तुकाराम महाराजांची ही गाथा इंद्रायणी नदीच्या डोहात बुडवून टाकण्यात आली. तरीही संत तुकारामांच्या भक्तीचा चम त्कार म्हणून हे अभंग इंद्रायणीच्या पाण्यावर तरले, असं म्हटलं जातं. ही अद्वित्तीय अभंगगाथा इंद्रायणीच्या डोहात बुडवल्यापासून ते तरंगेपर्यंतच्या तेरा दिवसात जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज, त्यांची पत्नी आवली, त्यांचे कुटुंब, संपूर्ण तत्कालीन समाज आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे पाईक या सर्वांवर काय परिणाम झाला याची कथा 'आनंदडोह' या चित्रपटात पाहायला मिळणार आहे.

**वाहते गटार, रस्त्यात खड्डे, अतिक्रमण, पाणी-वीज टंचाई ...याच मुलभूत सुविधा आहेत काय?**





CMYK

## बालदिन

आज १४ नोव्हेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात बालदिन म्हणून साजरा केला जातो. वास्तविक जागतिक पातळीवर २० नोव्हेंबरला बालदिन साजरा केला जातो. १९५४ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने ठरवल्यानुसार, पाहिल्यांदाच बालदिन साजरा करण्यात आला. सर्व देशांनी लहान मुलामुलींमध्ये सांप्रदायिक आदान–प्रदान व विविध संप्रदाय वा धर्माबाबतचे सामंजस्य वाढवणे तसेच जगभरातील मुलामुलींचे आयुष्य अधिक चांगले बनवण्याची संकल्पना मान्य करून त्यादृष्टीने काम करावे हा त्या मागचा हेतू. २० नोव्हेंबर हीच तारीख निवडण्याचे कारण असे की १९५९ मध्ये याच तारखेस संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने बाल हक्कांची सनद स्वीकारली. शिवाय १९८९ मध्ये याच दिवशी बाल हक्कांच्या मसुद्यावर सह्या झाल्या. हे हक्क आतापर्यंत १९१ देशांनी मान्य केले. भारतात मात्र १४ नोव्हेंबर रोजी बालदिन साजरा केला जातो. कारण भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचा हा जन्मदिवस. १४ नोव्हेंबर १८८९ रोजी अलाहाबाद येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म झाला. पंडित नेहरूंना लहान मुले खूप आवडायची. ते सतत लहान मुलांच्या गराड्यात असायचे. लहानमुले हेच देशाचे भविष्य आहे. आजचा बालक उद्याचा नागरिक आहे. तो नेहमी आनंदी, उत्साही आणि सुरक्षित असायला हवा. देशातील लहान मुले सुरक्षित तर देश सुरक्षित असे ते नेहमी म्हणत. मुलामुलींना सुरक्षित आणि प्रेमाच्या वातावरणात वाढवले गेले पाहिजे तसेच त्यांना आपले आयुष्य फुलवण्याच्या आणि पर्यायाने देशाच्या विकासात भर घालण्याच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते. पंडित नेहरू हे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान होते. पंडित नेहरूंना बालकांविषयी वाटणाऱ्या प्रेमाची आठवण म्हणून हा दिवस बालदिन म्हणून साजरा केला जातो शिवाय पंडित जवाहरलाल नेहरूंना मुलांविषयी वाटणाऱ्या प्रेम व जिव्हाळ्याविषयी आदर व्यक्त करण्याचा देखील हा एक मार्ग आहे. बालकांनाही आनंद घेण्याचा, मौजमस्ती करण्याचा हक्क आहे. आजचे बालक हाच देशाचे भविष्य आहे. या बालकांमधूनच देशाचे भावी सुशिक्षित तसेच मनाने आणि शरीराने आरोग्यसंपन्न असे नागरिक तयार होणार आहेत. हा हक्क मिळालेल्या नशीबवान बालकांनी आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेण्याची जाणीव ठेवली पाहिजे. पालकांनी ही जाणीव आपल्या मुलांमध्ये रुजवली तर भावी नागरिक सुज्ञ आणि समजूतदार बनतील त्यामुळे देशाचे भविष्य उज्वल होईल. बालदिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने मुलांच्या कल्याणासाठी काहीतरी करण्याचा संकल्प केला पाहिजे. देशातील सर्व मुलामुलींना बालदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

# धनंजय मुंडे हे अजित पवारांचेच भाऊ, काकांच्या पाठीत सुरा खुपसणारे

### जितेंद्र आव्हाड यांची धनंजय मुंडे व अजित पवार यांच्यासह फडणवीसांवर टीका

दैनिक आपला विदर्भ



**ठाणे/प्रतिनिधी :** धनंजय मुंडे यांच्याबद्दल बोलायचे झाले तर, मी खूप काही बोलू शकतो, त्याला फक्त माझा एकच प्रश्न विचारा बियाणीचा मर्डर कोणी केला, त्याच्यामागचे कारण काय होते. हिंमत आणि खऱ्या बापाचा पोरगा असेल तर याचे उत्तर द्यावे, नाही तर आमच्या एक भगिनी आहेत. करुणा मुंडे नावाच्या त्यांना बाजुला मी घेऊन बसतो आणि त्यांना सांगायला लावतो. धनंजय मुंडे हे अजित पवारांचेच भाऊ आहेत. काकांच्या पाठीत सुरा खुपसणारे अशी जहरी टीका जितेंद्र आव्हाड यांनी केली. ते प्रसारमाध्यमांसमोर बोलत होते. यावेळी जितेंद्र आव्हाड म्हणाले की, जो खुद सिशोके घरो मे रहते हे, ओ दुसरो के घरो पे पत्थर नही मारा करते, मी शरद पवारांचे सर्वात जास्त नुकसान केले, घर फोडले, मग हे शरद पवार यांना जाऊन एकदा विचारा, धनंजय मुंडे जर असे सांगत असतील तर मी बोलतो हो मी तस केले,धनंजय मुंडे ने कशाला सांगायला हवे, हे एकदा शरद पवार यांच्या तोंडून येऊ द्या ना, धनंजय मुंडे कोण? हा अजित पवारांचाच भाऊ, काकांच्या पाठीत सुरा खुपसणारा, स्वतःच्या बहिणीला छळणारा, आता गोडवे गातायत पूर्वी काय केले ते मला विचारा मी सांगतो, मी जो प्रश्न केला तो उभ्या महाराष्ट्राने त्याला करावा की डॉ. बियाणीचा मर्डर कोणी केला. तर अजित पवार यांनी मुब्रा येथे कितीही सभा घेऊ द्या,असे आव्हाड म्हणाले तर कुठल्याही पातळीवर जाऊन देशमुखांवर आरोप करायचे, पुरावा काहीच नव्हता, चांदीवाल कमिशनने लिहिले ते खरच आहे. परमवीर सिंग आणि वाजे यांनी कुठलाही एक पुरावा दिला नाही आणि कोर्टाने देखील शेवटी तेच सांगितले आहे. यांना फक्त फसवायचे होते शरद पवारांना अडकवायचे होते पण जमले नाही,आतासुद्धा मागच्या महिन्यात १२–१४ अधिकाऱ्यांना पोलिसांनी बोलावून घेतले होते, त्यात प्रत्येकाला सांगितले होते की तुम्ही शरद पवारांचे नाव घ्या, बैठक सिल्वर ओक ला झाली असे सांगा, तर पाच वर्षांपूर्वी शरद पवारांनी मला सांगितले होते की, हे लोक रोज सकाळी घरी येतात. रोज सकाळी येऊन चला बीजेपीत जाऊया असे सांगायचे, शरद पवार यांना जायचंच नव्हते म्हणून ते फक्त म्हणायचे की बघूया, चर्चा करूया, तुम्हाला राजकीय मॅच्युरिटी नाही हाच त्यातला अर्थ आहे, ते तुम्हाला फक्त टाळत होते. हे सुद्धा कळले नाही,पक्ष वाढवण्यात ते एकटेच होते ? पक्ष सगळ्यांनी मिळून मोठा केला, हे मी नक्की सांगेल की छगन भुजबळ यांचा वाटा मोठा होता. पण मुख्यमंत्री करायला २००४ संधी एकदाच संधी आली, त्यामुळे या सगळ्यांमध्ये भांडण होऊ नये म्हणून त्यांनी योग्य निर्णय घेतला. छगन भुजबळ,शिवसेना फोडण्याचे पुण्यकर्म शरद पवारांनी केले असा आरोप केला जात असताना तेव्हा तुम्ही काय बोळ्याने दूध पीत होते, संघटना फोडल्यानंतर त्याचा सर्वात जास्त फायदा कोणाला झाला असा प्रश्नही यावेळी त्यांनी केला. छगन भुजबळांच्या प्रॉपर्टी ज्या बांद्रामध्ये आहेत. त्या कोणामुळे आहेत, महसूल मंत्री असताना जे प्लॉट त्यांनी घेतले, त्यावर त्यांचे आज कॉलेज उभे आहे. त्याची मार्केट व्हॅल्यू हजारो करोडो आहे, मी एवढेच सगळ्यांना सांगतो की, कृपया आरोप करू नका,तुम्हाला काय दिले नाही शरद पवार यांनी, घरी बसला होतात नाशिकला जाऊन माझ्यासमोर पवार साहेबांनी निरोप दिला की त्यांना बोलवून घ्या, त्यांना बोलून विधानपरिषद दिली. त्यांच्यासाठी काँग्रेसमध्ये त्यांचे नाव खराब झाले, त्यामुळे काँग्रेसचा अधिकृत उमेदवार पडला. धनंजय मुंडे काय बोलणार शरद पवारांवर, शरद पवारांनी फक्त आ केले तर, धनंजय मुंडे घरात बसेल जाऊन पण शरद पवार बोलत नाहीत.ते कधीच कोणाबद्दल बोलू इच्छित नाहीत. तर अब्दुल सत्तार हे मी मुख्यमंत्री बदलण्याची ताकद ठेवतो, माकड बोलतो माझीच लाल काय बोलायचे, आपण कशाला मध्ये पडायचे, अब्दुल सत्तार महान माणूस आहे अशी टीकाही सत्तार यांच्यावर केली.तर अजित पवार हे एकीकडे माझे रक्ताचे नाते आहे, मी मुलासारखा आहे असे म्हणतात, तर दुसरीकडे शरद पवारांवर टीका करतात, ज्यांनी तुम्हाला अंगा खांद्यावर खेळवल,हाताला धरून चालायला शिकवले त्याची मरणाची इच्छा व्यक्त करणे याला काय म्हणायचे असा प्रश्नही केला. फडणवीस यांनी व्होट जिहाद म्हणजे काय ते सांगावे, लोकसभेत जर व्होट जिहाद झाले तर ज्या जागांवर जिंकले, त्या ठिकाणी मुसलमान किती टक्के आहेत ते सांगावे, तुमचा एक एक उमेदवार अडीच तीन लाखांनी हारला मग तो काय मुसलमानांमुळे हारला का असा प्रश्नही केला. ज्या पद्धतीने तुम्ही मराठा विरुद्ध ओबीसी भांडण लावून दिले आहे ते मराठ्यांना आणि ओबीसींनाही समजत आहे, विरोधकांच्या नाकावर टिचून फडणवीस पैसे खात्यात जमा केले, त्यांनी कॉन्ट्रॅक्टरची किती बिल पेंडिंग आहेत, विधवा बहिणींना घर चालवण्यासाठी जे पैसे मिळायचे ते किती महिने झाले पेंडिंग आहेत, अपंगांना मिळणार अनुदान किती महिन्यापासून बंद आहे, स्कॉलरशिप किती महिन्यापासून बंद आहे, हेही सांगावे, असे आव्हानही जितेंद्र आव्हाड यांनी विरोधकांना केले.

# काका-पुतण्या वादाचा नवा अंक, अजित पवारांचा युगेंद्रवर पहिला वार...

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** राज्याच्या राजकारणात काका–पुतण्या वादाचा आणखी एक अंक सुरू झाला आहे. बारामती विधानसभा निवडणुकीत अजित पवारांविरोधात त्यांचे पुतणे युगेंद्र पवार मैदानात उतरले आहेत. आता अजित पवारांनी आता युगेंद्रवर पहिला बोचरा केला आहे. लोणी भापकर येथे ग्रामस्थांशी संवाद साधताना अजित पवारांनी आपले काका, शरद पवार यांच्यावरही टीका केली. त्यानंतर युगेंद्र यांनाही लक्ष्य केले.



बारामती विधानसभेच्या निवडणुकीत अजित पवार कोणतीही जोखीम स्वीकारण्यास तयार नाहीत. राष्ट्रवादीत फूट पाडल्यानंतर अजित पवारांनी महायुतीत प्रवेश केला. त्यानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांना धक्का बसला. बारामती लोकसभा मतदारसंघातून अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा सुप्रिया सुळे यांनी पराभव केला. या निवडणुकीत बारामती विधानसभा मतदारसंघातून सुप्रिया सुळे यांना जवळपास ४८ हजार मतांची आघाडी होती. त्यानंतर आता अजित पवार यांनी विधानसभेच्या निवडणुकीसाठी त्यांनी जोखीम न घेता गाव दौरे सुरू केले आहेत.

शरद पवारांनी टीकास्त्रष्ठ.

शरद पवारांच्या वयाचा आदर करून सुप्रियाला निवडून दिले. शरद पवार साहेब म्हणाले मी निवृत्त होणार आहे. वयाने निर्णय घेणार असतील. पण, त्यांच्या पुढचे काम करू शकतं? मी भावनिक करीत नाही. पण शरद पवार ३० वर्ष राज्यात काम केल्यानंतर त्यांनी दिल्लीत काम केलं असल्याचे अजित पवारांनी म्हटले. मी निवडणूक डोळ्यासमोर ठेवून काम करीत नाही. माझी फुशारकी नाही तर काम बोलतं असेही अजित पवारांनी म्हटले.

लोकसभेला पण सांगायचे साहेबांची शेवटची निवडणूक आहे सुप्रिया कडून लक्ष द्या. आता पण सांगतात साहेबांची शेवटची निवडणूक आहे नातवाकडे लक्ष द्या. आता हे अवघडच आहे. मी पण पुतण्या आहे ना? मुलगी झाली की थेट नातूच समोर आणला, मी पण मुलासारखाच आहे ना? असा सवाल अजित पवारांनी केला.

यावेळी अजित पवारांनी आपला पुतण्या आणि शरद पवार गटाचे उमेदवार युगेंद्र पवार यांच्यावर टीका केली. त्यांनी म्हटले की, १९८९ मध्ये शरद पवार म्हणत होते की, मी अजितला तिकीट देणार नाही. पण मला १९९१ ला मला तिकीट दिले. आता काही लोक काळ काम सुरू केलं नाही की त्यांना आमदारकीची स्वप्न पडायला लागली, असा टोलाही युगेंद्रला लगावला.

अजित पवारांनी पुढे म्हटले की, मला इंग्लिश येऊ नाहीतर येऊ नये. परंतु मी राज्याचा उपमुख्यमंत्री आहे. मी साडे साडेसहा लाख कोटींचा बजेट सादर करतो. साडेसहा लाख कोटी मधला त्याला टिंब काढून दाखव म्हणावं. तो माझा पुतण्या आहे. मी त्याच्यावर टीका नको करायला, असे टीकास्त्र अजित पवारांनी युगेंद्र पवारांवर सोडले.

## कटेंगे बटेंगे सोडा महागाईच बोला, थोरातांचा विरोधकांना टोला

**मुंबई/प्रतिनिधी :** निवडणूक आयोगाकडून माझ्या व प्रभावती घोगरे यांच्या भाषणांवर बंदी येण्याची शक्यता आहे. तशी तयारी देखील सध्या सुरु आहे. एवढी भीती नेमकी कशाची वाटली असे म्हणत काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी महायुतीवर टीका केली. अनेक कार्यकर्त्यांचे हातपाय तोडले. हे सगळं भीती बसवण्याकरता. मात्र तुम्ही घाबरायचं नाही काकीला मतदान करायचं. गुलामगिरीत राहायचं नाही. नाहीतर गुलामगिरी कायमची बोकांडी बसल्याशिवाय राहणार नाही असे थोरात म्हणाले. कटेंगे बटेंगे सोडा महागाईच बोला असा टोलाही थोरातांना लगावला. कटेंगे बटेंगे सोडा महागाईच बोला, हे बोललं तर अडचण येईल म्हणून वेगळ्या प्रश्नाकडे घेऊन जायचा प्रयत्न विरोधकांचा सुरू असल्याचे थोरात म्हणाले. माझं गाव या मतदार संघात आहे. मी इथला मतदार आहे. मला म्हणतात यांचा इकडे काय संबंध. आम्ही गणेश कारखाना अडचणीतून चांगला चालवला. आम्ही सिद्ध केलं की आम्ही करू शकतो. त्यामुळं २० तारखेला आघाडीला मतदान नक्की द्या असे थोरात म्हणाले. शिर्डी विधानसभा मतदारसंघाच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रभावती घोगरे यांच्या प्रचारार्थ आयोजीत केलेल्या सभेत त्या ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवारही उपस्थित होते.

# खामगाव मतदारसंघात चार नवीन मतदान केंद्र

### मतदारांनी आपल्या मतदान केंद्राची माहिती करुन घेण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी:** विधानसभा निवडणूकीत मतदारांना मतदान करणे सोईचे व्हावे, यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदारसंघात मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार २६– खामगांव विधानसभा मतदारसंघात चार नवीन मतदार केंद्राची निर्मिती करण्यात आली असून आता खामगांव मतदारसंघात ३२२ मतदान केंद्र झाले आहेत. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी सर्व मतदारांनी मतदानाच्या दिवशी मतदान करावे. यासाठी मतदारांनी आपले नाव मतदार यादीत असल्याची खात्री करुन घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

मतदान केंद्राच्या रचनेत सुसूत्रता आणण्यासाठी ज्या मतदान केंद्रांवर मर्यादेपेक्षा जास्त मतदार आहेत किंवा दोन गावातील मतदार एकाच मतदान केंद्रांना जोडण्यात आलेले होते, असे सर्व मतदान केंद्र मिळून जिल्ह्यात नव्याने २३ मतदान केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. खामगांव मतदार संघात चार नवीन मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये खामगाव शहरी, ग्रामीण व घाटपूरी येथे मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामुळे खामगांव विधानसभा मतदारसंघात ३२२ मतदान केंद्र झाले असून शहरी भागात ७८ तर ग्रामिण भागात २४४ मतदान केंद्र आहेत. नवीन मतदान केंद्राच्या निर्मितीमुळे कुटुंबातील सर्व मतदारांची नावे एकाच मतदान केंद्रावर उपलब्ध होणार आहेत.

लोकसभेला जिल्ह्यात २ हजार २६५ मतदान केंद्रे होती. यात २३ नवीन मतदान केंद्रांची वाढ होऊन २ हजार २८८ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत. दि. १ जुलै २०२४ अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुनर्रीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदान केंद्र सुसूत्रीकरणांतर्गत मतदान केंद्रात वाढ करण्यात आली आहे.

**मतदारसंघात चार नवीन मतदार केंद्राची वाढ**

१. ५३– खामगांव ग्रामीण मतदान केंद्रावर १४०० पेक्षा जास्त मतदार झाल्यामुळे ५४–खामगांव ग्रामीण मौलाना अबुल कलाम आझाद नगर परिषद ऊर्दु प्राथमिक शाळा येथे नवीन मतदान केंद्र तयार करण्यात आले आहेत.

२. ९६–घाटपूरी श्रीमती सरलाबाई वरणगांवकर विद्यालय मतदान केंद्रावर १४०० पेक्षा जास्त मतदार झाल्यामुळे मतदान केंद्र ९८–घाटपूरी श्रीमती सरलाबाई वरणगांवकर विदयालय खोली क्र.४ येथे नवीन मतदान केंद्र तयार करण्यात आले आहेत.

३. १५२–खामगांव मो. जिया उलहक खान नगर परिषद उुर्दु प्राथमिक शाळा मतदान केंद्रावर १४०० पेक्षा जास्त मतदार झाल्यामुळे मतदान केंद्र १५५–खामगांव शहीद अब्दुल हमीद नगर परिषद ऊर्दु प्राथमिक शाळा क्र.१ अशफाक उल्ला हॉल येथे नवीन मतदान केंद्र तयार करण्यात आले आहेत.

४. १६०–खामगांव अंजुमन हायस्कुल मतदान केंद्रावर १४०० पेक्षा जास्त मतदार झाल्यामुळे मतदान केंद्र १६४–खामगांव अंजुमन हायस्कुल मुलींची ऊर्दु शाळा खोली क्रमांक ६ येथे नवीन मतदान केंद्र तयार करण्यात आले आहेत.

प्रथमच मतदानाचा हक्क बजावणार ७ हजार ९५७ नवमतदार

२६– खामगांव मतदारसंघात २ लक्ष ९७ हजार ९२२ मतदार असून त्यामध्ये १ लक्ष ५५ हजार ६३२ पुरुष तर १ लक्ष ४२ हजार २८५ महिला व ५ तृतीयपंथी मतदार आहेत. ८५पेक्षा जास्त वयोमान असलेले मतदार २ हजार ४६८ असून ९६१ पुरुष तर १ हजार ५०७ महिला मतदार आहेत. तसेच विधानसभा निवडणुकीमध्ये प्रथमच मतदानाचा हक्क बजावणारे ७ हजार ९५७ नवमतदार असून ४ हजार ७५५ पुरुष तर ३ हजार २०२ महिला नवमतदार आहेत.

## मतदान यादीत नाव असल्याची मतदारांनी खात्री करावी– जिल्हाधिकारी डॉ. पाटील



भारत निवडणूक आयोगाने घोषीत केलेल्या कार्यक्रमानुसार दि. २० नोव्हेबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी सर्व मतदारांनी मतदानाच्या दिवशी मतदान करावे. यासाठी मतदारांनी आपले नाव मतदार यादीत असल्याची खात्री करुन घ्यावी. मतदार केंद्र जाणून घेण्यासाठी व्होटर हेल्पलाईन ॲप किंवा voters.eci.gov.in या संकेतस्थळाचा वापर करावा. तसेच मतदार नोंदणी किंवा मतदान केंद्राची माहिती शोधण्याच्या बाबतीत काही मदत हवी असल्यास १९५० या टोल फ्री क्रमांक किंवा खामगांव मतदारसंघासाठी हेल्प लाईन क्रमांक १८००२३३६४४६ वर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# सुषमा अंधारे यांची पाचोरा येथे प्रचारसभेत सत्ताधाऱ्यांवर तीव्र टीका

दैनिक आपला विदर्भ

**ज ळ गा व / प्र ति नि धी :** शिवसेनेच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी २०२४विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू करताना पाचोरा येथील प्रचार सभेत सत्ताधारी शिंदे-भाजप सरकारवर तीव्र शब्दांत टीका केली. त्यांच्या भाषणात त्यांनी शिंदे गटाच्या नेत्यांच्या धोरणांना कठोर शब्दांत आव्हान दिले आणि लोकशाही व विकासाच्या मुद्द्यांवर गंभीर आरोप केले.

सुषमाताई अंधारे यांनी शिंदे गटाच्या आमदारांना गद्दार म्हणून संबोधले. शिवसेना आणि तिच्या कार्यकर्त्यांची ऐतिहासिक परंपरा लक्षात ठेवून त्यांना कधीही गद्दारी करण्याचा अधिकार नाही. आज जे शिंदे गटाच्या आमदार सत्तेच्या लालसेतून पक्ष बदलून सत्ताधाऱ्यांच्या कडे गेले आहेत, ते त्यांच्या लोकशाही मूल्यांचे उल्लंघन करत आहेत, असे त्यांनी नमूद केले.

सुषमा अंधारे यांनी सत्ताधारी शिंदे-भाजप सरकारवर राज्यातील विकासकामांमध्ये अपारदर्शकता आणि अपयशाचे आरोप केले. शिंदे गटाने केवळ सत्तेसाठी शिवसेना सोडली, पण राज्यातील विकास कामांकडे दुर्लक्ष केले. शहरांमध्ये रस्ते, पाणी, आरोग्य सेवा व शिक्षण व्यवस्थेतील असंख्य समस्या जसाच्या तशा आहेत, असे त्यांना सांगितले. पाचोरा परिसरातील समस्या न सोडविल्याचा त्यांनी आरोप केला.

शेतकऱ्यांच्या समस्यांचा मुद्दा: सुषमा अंधारे यांनी शेतकऱ्यांच्या अडचणींना प्रमुख मुद्दा बनवला. शेतकऱ्यांना अजूनही कर्जमाफी, पीकविम्याची मदतीची आवश्यकता आहे. शिंदे गटाने शेतकऱ्यांच्या हितासाठी काहीही ठोस पाऊल उचलले नाही. शेतकरी आणखी कर्जाच्या जंजाळात अडकले आहेत, असे ते म्हणाल्या. सुषमा अंधारे यांनी राज्यातील सामान्य नागरिकांच्या समस्या, जसे की बेरोजगारी, महागाई, आणि आरोग्य सेवा यावर सत्ताधारी सरकारला जबाबदार धरले. लोकशाहीचे पालन करणारे सरकार असावे लागते, पण सत्ताधारी मात्र आपल्या स्वार्थासाठी लोकांच्या मूलभूत समस्यांकडे दुर्लक्ष करत आहेत, असे त्यांनी सांगितले.



अंधारे यांनी उद्धव ठाकरे यांना राज्याचे एक सक्षम आणि कर्तव्यदक्ष नेतृत्व म्हणून गौरवले. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना नेहमीच महाराष्ट्राच्या हितासाठी काम करत राहिली.

सुषमा अंधारे यांच्या भाषणाला पाचोरा येथील सभेला मोठ्या प्रमाणात उपस्थित असलेल्या लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यांनी अनेक वेळा शिंदे गटाच्या धोरणावर सवाल केला आणि ठरवले की २०२४ मध्ये महाराष्ट्रात शिवसेनेचा विजय निश्र्चित करायचा आहे. सुषमा अंधारे यांनी पाचोरा येथील प्रचार सभेत शिंदे-भाजप सरकारवर तीव्र टीका केली, त्यांच्या विकासाच्या वचनांवर प्रश्न उपस्थित केले आणि शेतकरी, सामान्य नागरिक, तसेच शिवसेनेच्या कार्यकर्त्यांच्या हिताची बाजू घेतली. त्यांच्या भाषणामुळे शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये एक नवीन उत्साह निर्माण झाला आहे.

## महत्त्वाचे...

### राज्यात कुणाच्या कितीही जागा येऊ द्या सरकार आमच्या शिवाय बनणार नाही- बच्चू कडू



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी:** देगलूर बिलोली विधानसभा प्रहार जनशक्ती पार्टीचे अधिकृत उमेदवार सुभाष साबणे यांच्या प्रचारार्थ बच्चू कडू यांनी जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला बच्चू बोलताना म्हणाले की राज्यामध्ये कुणाचे कितीही आमदार येऊ सरकार आमच्या शिवाय बनणार नाही. भारतीय जनता पार्टीने कटेंगे या बटेंगे या घोषणे विरोधात बच्चू कडू यांनी जाहीर टीका केली आहे ते म्हणाले की आमचा नारा सर्व सामान्यांना घेऊन चालणारा असून हम लोगों को जोडणे आये है और जोडकर जितेंगे.

### फसवणूक प्रकरणी धोनीला नोटीस, कोर्टाने दिले हे आदेश, जाणून घ्या काय आहे संपूर्ण प्रकरण?

रॉची : झारखंड उच्च न्यायालयाने महेंद्रसिंग धोनीला नोटीस बजावली आहे. टीम इंडियाच्या माजी कर्णधाराला १२ नोव्हेंबरला ही नोटीस मिळाली, ज्यामध्ये त्याला फसवणूक प्रकरणात आपली बाजू मांडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. धोनीचे माजी भागीदार मिहिर दिवाकर आणि सौम्या दास हे अर्का स्पोर्ट्स अँड मॅनेजमेंट लिमिटेडमध्ये गुंतवणूकदार आहेत. धोनीने त्यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. धोनीने ५ जानेवारीला हा खटला दाखल केला होता. मिहिर आणि सौम्या यांनीही धोनीच्या याच तक्रारीविरोधात याचिका दाखल केली होती, ज्यावर १२ नोव्हेंबर रोजी सुनावणी झाली.

या प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती संजय कुमार द्विवेदी यांच्या न्यायालयात झाली. सुनावणी पूर्ण झाल्यानंतर धोनीला आपली बाजू मांडण्यासाठी नोटीस पाठवण्यात आली असून, त्यात त्याला हजर राहून आपली बाजू मांडण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या वर्षी जानेवारी महिन्यात भारताच्या माजी कर्णधार सौम्या दास आणि मिहीर दिवाकर, जे केवळ धोनीचे व्यावसायिक भागीदारच नाहीत, तर त्यांचे चांगले मित्रही आहेत, यांच्याविरुद्ध दाखल केलेल्या तक्रारीत त्यांनी आरोप केला होता की, या दोघांनीही त्याच्या नावाचा चुकीचा वापर केला आणि १५ कोटींची फसवणूक केली.

या संपूर्ण प्रकरणात मिहिर दिवाकर आणि सौम्या दास यांनी झारखंड उच्च न्यायालयात धाव घेतली, जिथे त्यांनी रांचीच्या न्यायदंडाधिकाऱ्यांच्या निर्णयाला आव्हान दिले. याच प्रकरणी उच्च न्यायालयात सुनावणी झाली. आता नोटीस मिळाल्यानंतर धोनी किती दिवसांनी आपली बाजू मांडणार हे पाहायचे आहे. कारण त्याला कोणत्या तारखेपर्यंत बाजू मांडण्याचे आदेश दिले आहेत, याबाबत कोणतीही ठोस माहिती नाही.दरम्यान घ्झ्ङ २०२५ मध्ये खेळण्यासाठी सज्ज असलेला धोनी लवकरच त्याच्या तयारीत व्यस्त दिसणार आहे. सीएसकेने त्याला पुढील मोसमासाठी ४ कोटी रुपयांम ध्ये कायम ठेवले आहे.

### लांब पल्ल्याच्या क्रूझ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी, क्रूझ मिसाईलनं साधला लक्ष्यावर अचूक निशाना

नवी दिल्ली : संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं मंगळवारी एक नवा विक्रम केलाय. ओडिशातील चांदीपूर येथील एकात्मिक चाचणी श्रेणीवरून प्रथमच जमिनीवर हल्ला करणाऱ्या क्रूझ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी करण्यात आली आहे. हे जहाजविरोधी बॅलिस्टिक क्रूझ क्षेपणास्त्र आहे. त्याची रेंज एक हजार किलोमीटरपर्यंत आहे. संरक्षण मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, क्षेपणास्त्राच्या सर्व उपप्रणालींनी चांगली काम गिरी केलीय. या यशाबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही डीआरडीओचे अभिनंदन केलं आहे.

प्रगत सॉफ्टवेअरनं सुसज्ज क्षेपणास्त्र : संरक्षण मंत्रालयानं सांगितलं की, क्षेपणास्त्राने पॉइंट नेव्हिगेशनचा वापर करून आपल्या मार्गाचा अवलंब केलाय. वेगवेगळ्या उंचीवर आणि वेगाने उड्डाण करताना आपली क्षमता क्षेपणास्त्रानं प्रदर्शित केलीय. या क्षेपणास्त्रात अत्याधुनिक एव्हीओनिक्स आणि सॉफ्टवेअरही आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने ओडिशातील एकात्मिक चाचणी श्रेणी चांदीपूर येथून मोबाईल आर्टिक्युलेटेड लाँचरमधून लांब पल्ल्याच्या लँड अटॅक क्रूझ क्षेपणास्त्राची (थ्रंथ्अण्१) पहिली चाचणी घेतली.

या कंपन्यांनी विकसित केलं क्षेपणास्त्र : रडार, इलेक्ट्रो-ऑप्टिकल ट्रॅकिंग सिस्टीम आणि टेलीमेट्री यांसारख्या अनेक श्रेणी सेन्सर्सद्वारे क्षेपणास्त्राच्या कामगिरीचं परीक्षण केलं गेलं. चाचणीवेळी डीआरडीओचे वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि तिन्ही लष्कराचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. हे क्षेपणास्त्र बेंगळुरूच्या एरोनॉटिकल डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट, उळ्ज आणि इतर भारतीय उद्योगांच्या सहकार्यानं विकसित केलं आहे. हैद्राबादस्थित भारत डायनॅमिक्स लिमिटेड आणि बंगळुरूची भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड या कंपन्यानी देखील या प्रकल्पात भाग घेतलाय.

क्षेपणास्त्र डागता जहाजावरूनही येणार : हे क्षेपणास्त्र मोबाईल आर्टिक्युलेटेड लाँचर वापरून जमिनीवरून आणि युनिव्हर्सल व्हर्टिकल लाँच मॉड्यूल सिस्टमद्वारे फ्रंटलाइन जहाजांना जोडलं जाऊ शकतं. क्षेपणास्त्राच्या यशस्वी चाचणीबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी डीआरडीओ, सशस्त्र दल आणि उद्योगसमूहाचे अभिनंदन केलंय. यामुळं भविष्यात स्वदेशी क्रूझ क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमांचा मार्ग म ोकळा होईल, असं ते म्हणाले. हा संरक्षण अधिग्रहण परिषदेनं थ्रंथ्अण्१ मंजूर केलेला मिशन मोड प्रकल्प आहे.

# शपथ घेतली असताना फडणवीसांनी अजित पवारांना फाईल दाखवली

## सुप्रिया सुळे यांची फडणवीसांवर टिका

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी:** देवेंद्र फडणविसांनी गोपनीयतेची शपथ घेतली असताना ज्या व्यक्तीवर, पक्षावर आरोप केले. त्या व्यक्तीला घरी बोलवून फाईल दाखवली,असा घणाघात सुप्रिया सुळे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर केला. फडणवीसांनी याचे उत्तर द्यावे, हा गुन्हा नाही का ? असा प्रश्न करून निवडणुका पारदर्शकपण व्हावी, संविधानाच्या चौकटीत व नियमाने व्हावी, असी अपेक्षा सुद्धा यावेळी सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केली. त्या नागपूर येथे प्रसारमाध्यमांसमोर बोलत होत्या. यावेळी त्या म्हणाल्या की,विरोधक म्हणून माझ्या देवेंद्र फडणवीस यांच्याकडून प्रचंड अपेक्षा होत्या, एक युवा नेता, कर्तुत्ववान, पाच वर्षे राज्याचे मुख्यमंत्री राहिले आहेत. मी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आदराने पाहिले आहे, पण जेव्हा त्यांनी



पहिले वक्तव्य केले ना की दोन पक्ष फोडून आलो ते अस्वस्थ करणारे होते. दुसरं कोणी बोलले असते तर वाईट वाटले नसते पण फडणविसांकडून अपेक्षा नव्हती, सांगली मध्ये अजित पवारांनी एका भाषणात ते असे म्हणाले की, फडणविसांनी अजित पवारांना घरी बोलवले आणि फाईल दाखवली, सिंचनाचे ७० हजार कोटी रुपयाचे आरोप हे फडणविसांनी अजित पवार आणि राष्ट्रवादीवर केले होते. याची चौकशी झाली पाहिजे ही मागणी फडणविसांनी केली. देवेंद्र फडणविसांनी गोपनीयतेची शपथ घेतली असताना ज्या व्यक्तीवर पक्षावर तुम्ही आरोप केले. त्या व्यक्तीला घरी बोलवून फाईल दाखवली, देवेंद्र फडणवीस यांना याचे उत्तर द्यावे लागेल, हा गुन्हा नाही का ?असा प्रश्न उपस्थित केला. जर आरोप खोटे होते तर फडणवीसानी राज्यसमोर मान्य करावे, हा देश कुणाच्या मनमानीने चालत नाही तर संविधानाने चालतो. शरद पवार भावना दाखवल्या नाहीत, त्यांनी विकासावरच मते मागितली आहेत. पवारांची शेवटची निवडणूक असे कोणी बोलले असेल तर ते दुर्दैवी आहे. पहाटे शपथविधी बाबत मी ऑन कॅमेरा सांगते, अशी कुठलीही बैठक झाली आणि याची माहिती मला नाही. पहाटेच्या शपथविधी बद्दल आम्हाला कोणालाच माहित नव्हते, तर उद्धव ठाकरे यांना सतत टार्गेट केले जात आहे. त्यांची बॅग तपासणी फडणवीस यांच्या इशार्याने होत आहे. सातत्याने विरोधी पक्षाच्या नेत्यांच्या बॅगा कशा तपासल्या जात आहेत. या महाराष्ट्रात भाजपमध्ये फक्त नितीन गडकरी यांची बॅग तपासणी झाली, तीही आज कशी काय झाली, उद्धव ठाकरेंच्या आधी का नाही झाली असा प्रश्नही यावेळी सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केला. धनंजय मुंडे यांच्याबद्दल प्रश्न केला असता लोकशाहीत प्रत्येकाला बोलण्याचा अधिकार आहे, असे म्हणून त्यावर बोलण्याचे सुप्रिया सुळे यांनी टाळले.

### निवडणुकीनंतर अजित पवारच किंगमेकर, आमच्या अटी अन् शर्थीनुसार सरकारमध्ये सहभाग होणार- नवाब मलिक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अजित पवार हेच आगामी निवडणूक निकालानंतर किंगमेकर होणार आहेत. या निवडणुकीत त्यांचा स्ट्राइक रेट सर्वात जास्त राहणार आहे. अजित पवार किंगमेकर होतील आणि त्यानंतर आम्ही आमच्या अटी आणि शर्थीवर सरकारमध्ये सहभागी होऊ, असा विश्वास माजी मंत्री नवाब मलिक यांनी व्यक्त केलाय. ते मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. किमान समान कार्यक्रमाशिवाय आम्ही कोणत्याही सरकारमध्ये सहभागी होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केलंय. अल्पसंख्याक सम ाजाला तिकीट वाटपात संधी देण्याच्या मागणीकडे काँग्रेसने दुर्लक्ष केलंय. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या दोन्ही पक्षांनीदेखील अल्पसंख्याकांना उमेदवारीमध्ये जास्त प्रतिनिधित्व दिलं नाही. मात्र अजित पवारांच्या राष्ट्रवादीने १० टक्क्यांच्या आसपास अल्पसंख्याक समाजाच्या उम ेदवारांना रिंगणात उतरवलंय. त्यामुळे अल्पसंख्याक समाज आमच्या पक्षाच्या पाठीशी ठाम पणे उभा राहणार आहे, असा दावा त्यांनी केलाय.

पवारांनी १९७८ मध्ये पुलोद सरकार स्थापन केलं : अजित पवार भाजपा सोबत गेले, असा आरोप करणाऱ्यांवर त्यांनी टीका केली. शरद पवार १९७८ मध्ये पुलोद सरकार स्थापन करताना भाजपाच्या पूर्वसूरींसोबतच होते. याचा अर्थ त्यांनी विचारधारा सोडली नव्हती, ती राजकीय तडजोड होती. त्याचप्रमाणे अजित पवारांनीदेखील विचारधारा सोडलेली नाही. या देशात प्रत्येक पक्षाने राजकीय तडजोड करून निवडणुका लढवलेल्या आहेत. त्यामुळे केवळ अजित पवारांना लक्ष्य करणे पूर्णत: चुकीचे असल्याचे मलिक म्हणालेत. भाजपासोबत जाण्यात आमचा कोणताही वैचारिक गोंधळ नाही, असे अजित पवारांनी यापूर्वीच स्पष्ट केल्याकडे नवाब मलिकांनी लक्ष वेधलंय.

माझ्या विरोधातील केस संदर्भात बोलण्यास न्यायालयाने मनाई केलीय. म ात्र, इतर विषयांवर बोलण्यास न्यायालयाची मनाई नाही, असे त्यांनी सांगितलं. राजकीय व्यक्ती असल्याने आणि निवडणुकीच्या रिंगणात असल्याने माझे विचार मांडण्यास न्यायालयाने कोणतेही निर्बंध लादलेले नाहीत. गेल्या काही दिवसांमध्ये मी विविध विषयांवर जे बोलतोय, माझे मतप्रदर्शन करतोय, ते माझ्या काही हितचिंतकांना खटकले असावे, मी राजकारणातून संपलो, असा काहींचा गोड गैरसमज झाला होता. मात्र या निवडणुकीत मी स्वत: एका मतदारसंघातून आणि माझी मुलगी दुसऱ्या मतदारसंघातून, असे आम्ही दोघे निवडणुकीच्या रिंगणात आहोत आणि आम्हाला मतदारांचा उदंड अन् उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतोय. त्यामुळे म ाझ्यावर जास्त प्रेम करणाऱ्यांना माझा जामीन रद्द व्हावा, अशी इच्छा झाली असावी आणि त्यातून ही याचिका दाखल करण्यात आली असावी, असा टोला नवाब मलिक यांनी लगावलाय. न्यायालयात म ाझ्या जामिनाविरोधात याचिका दाखल करण्यात आली असून, या प्रकरणाची सुनावणी होईल, तेव्हा आपल्याकडून त्यावर उत्तर दाखल केले जाईल, असे मलिकांनी स्पष्ट केलंय. या माध्यमातून मला रोखण्याचा प्रयत्न केला जातोय, मात्र अशा प्रकारांना मी घाबरणार नाही. तुरुंगात जाण्यापासून आम्ही घाबरत नाही. आमच्या म्हणण्यावर आम्ही नेहमी ठाम राहतो. मी निवडणुकीच्या रिंगणात असल्याने तसेच मी माझे विचार मांडत असल्याने अनेकांना अडचणी निर्माण झाल्यात. त्यामुळे माझा जामीन रद्द करण्याचे कटकारस्थान सुरू झालंय, असा आरोप त्यांनी केलाय.

# बुलडोजर कारवाईवर ‘सुप्रीम’ चपराक, सरकारची मनमानी चालणार नाही, जारी केल्या सूचना

नवी दिल्ली : उत्तर प्रदेशमध्ये योगी सरकार सत्तेत आल्यानंतर त्यांनी बुलडोझरद्वारे अतिक्रमणाविरोधात धडाकेबाज कारवाया केल्या होत्या.या कारवाई विरोधात आता सुप्रिम कोर्टाने कठोर भूमिका घेत सरकारला खडेबोल सुनावलं आहे. ’तुम्ही केवळ आरोपी आहात म्हणून कोणाचे घर पाडू शकत नाही, अधिकारी आणि सरकारची मनमानी वृत्ती योग्य नाही, देशात कायद्याचे राज्य हवे, अशा शब्दात सुप्रिम कोर्टाने सरकार आणि प्रशासनाला खडेबोल सुनावले आहेत.



बुलडोझर कारवाईविरोधात सुप्रिम कोर्टात सुनावणी पार पडली आहे. या सुनावणीत सुप्रिम कोर्टाने सरकारला झाप झाप झापलं आहे. एखाद्या व्यक्ती आरोपी आहे म्हणून त्यांचे घर पाडले जाऊ शकत नाही. तसेच संबंधितावर बुलडोझरद्वारे कारवाई करणे हे सामुहिक दंड देण्यासारखे आहे. याला संविधानात परवानगी नाही आहे. तसेच एखाद्या आरोपीचे घर कायद्याच्या प्रक्रियेचे पालन न करता पाडल्यास, त्याच कुटुंब नुकसानभरपाई मि ळवण्यास पात्र असेल,असे देखील कोर्टाने सरकारला स्पष्टपणे सांगितले आहे.

सुनावणी झाल्याशिवाय कोणालाही दोषी म्हणता येणार नाही. आणि कार्यपलिका ही न्यायाधीश होऊ शकत नाही तसेच ती आरोपीची मालमत्ता पाडण्याचा निर्णय घेऊ शकत नाही. त्यामुळे न्यायदानाच काम न्यायपालिका करेल, कार्यपालिका ही न्यायपालिकेच काम करू शकत नाही. आणि पक्षपातीपणे कुठल्याही अधिकाऱ्यांनी कारवाई करू नये.अन्यथा याला जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल,अशा इशारा देखील सुप्रिम कोर्टाने दिला आहे.

# महाराष्ट्राच्या विकासासाठी पुन्हा महायुतीलाच कौल द्या : केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्राला देशातील पहिल्या क्रमांकांचे राज्य बनवण्याचा संकल्प भाजप महायुतीने केला आहे. तेव्हा, महाराष्ट्राच्या विकासासाठी पुन्हा महायुतीलाच कौल द्या असे आवाहन केंद्रीय नागरी उड्डाण व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केले. तसेच, लाडकी बहिण योजनेवर आधी टीका करणारे आता लाडक्या बहिणींना ३ हजार रुपये देण्याचे खोटे आश्र्वासन देत असल्याची टीकाही मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केली आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर भाजप महायुतीची भूमिका



स्पष्ट करण्यासाठी बुधवारी ठाण्यातील भाजप मिडिया सेंटर मध्ये आयोजित पत्रकार परिषदेत मुरलीधर मोहोळ बोलत होते. यावेळी आमदार निरंजन डावखरे , भाजप ठाणे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, प्रवक्ते सुजय पत्की, प्रदेश सोशल मिडियाचे प्रमुख प्रकाश खाडे,मा. नगरसेविका किरण मणेरा, जयेंद्र कोळी, विलास साठे आदीसह भाजप पदाधिकारी उपस्थित होते. मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी भाजपच्या संकल्प पत्रातील २५ कलमी विकास कार्यक्रमांचा आढावा घेऊन या संकल्प पत्राची अंमलबजावणी करण्यासाठी समिती नेमणार असल्याचे नमुद केले. केंद्रात मोदी सरकारने गेल्या १० वर्षात केलेल्या कामामुळे जगाच्या नकाशावर आपली वेगळी ओळख निर्माण झाली, किंबहुना, जगात भारताला जागतीक सत्ता म्हणुन महत्व प्राप्त झाले. तसेच २०४७ च्या विकसित भारताचा पाया याच दहा वर्षात रचला गेला. तेव्हा, महाराष्ट्राच्या विकासासाठी पुन्हा महायुतीलाच कौल देण्याचे आवाहन मोहोळ यांनी केले. महायुती सरकारने महिला शक्तीला आत्मनिर्भर करण्यासाठी विविध योजना राबवल्या आहेत. लाडकी बहिण योजनेतर्गत १५०० रुपये दिले म्हणून तिजोरीत पैसे नाहीत, अशी टीका काँग्रेस आघाडीतील विरोधकांनी केली होती. तरी महायुती सरकारने ही योजना यशस्वीपणे राबवून पुन्हा सरकार आल्यावर महिन्याला २१०० रुपये देण्याचे निश्र्चित केले आहे. हेच विरोधक आता लाडक्या बहिणींना ३ हजार रुपये देण्याचे खोटे आश्र्वासन देत असल्याची टीका मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केली आहे.

# गावोगावी सिद्धार्थ खरात यांचे जल्लोषात स्वागत

## महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांच्या पायाला भिंगरी

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर / प्रतिनिधी:** महविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ रामभाऊ खरात यांच्या हाती पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी मशाल आणि खांद्यावर भगवा झेंडा दिला आहे. या भगव्याची शान राखाली जावी म्हणून सिद्धार्थ रामभाऊ खरात व महाविकास आघाडीचे पदाधिकारी आपल्या पायाला भिंगरी लावून मशालीचा प्रचार घराघरात पोहोचत आहेत. तर, महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांना मतदारसंघात मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे,महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते व उमेदवार सिद्धार्थ मतदार संघातील कल्याणा परिसरात प्रचारार्थ गेले असता, कल्याणा सह गावोगावी नागरिकांच्या वतीने सिद्धार्थ खरात यांचे जल्लोसात स्वागत केले. जात आहे यावेळी माता-भगिनींनी औक्षण करून आशीर्वाद दिले,फेरीमध्ये प्रचंड संख्येने सहभागी होत गावातून वाजत गाजत मिरवणूक काढली. यावेळी महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी मारुतीरायाचे आणि विठ्ठल-रखुमाईचे दर्शन घेतले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाला अभिवादन केले. घरोघरी जाऊन गावकऱ्यांना भेटी दिल्या, त्यांचे प्रश्र्न समजून घेतले. परिवर्तन यात्रेमध्ये सर्व गावकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले, त्यांनी सिद्धार्थ रामभाऊ खरात यांना विधानसभेत पाठविण्यासाठी विश्र्वास दिला आणि यावेळी सगळे मिळून परिवर्तन घडवणारच अशी ग्वाही मतदारांनी दिली. मेहकर लोणार मतदार संघ हा शिवसेनेचा बालेकिल्ला असून मतदारांनी फक्त शिवसेनेचा उमेदवार म्हणून मत देत प्रचंड मतांनी विजयी केले आहे.मात्र, ज्यांना सत्तेच्या चाव्या दिल्या ते मतदारांशीच बेईमान झाले आहेत. त्यामुळे त्यांना आता धडा शिकवण्याची वेळ आली आहे, त्यांना आता त्यांची जागा दाखवून द्या, जागा दाखवण्याची वेळ आता मतदारांच्या हातात आहे. त्यामुळे मतदारांच्या मताची गद्दारी करणाऱ्यांना धडा शिकवा असे आवाहन या प्रचारादरम्यान महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी केले. तर मतदारांनीही उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या मशाल पुन्हा पेटवण्याचा निर्धार करून महाविकास आघाडीचा उमेदवार प्रचंड मताने विजय करू, असे आश्र्वासन यावेळी मतदारांनी दिले. कल्याणा परिसरातील युवक, युवती महिलांसह नागरिकांनी महाविकास आघाडीच्या प्रचार रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद देत जल्लोषात स्वागतही केले, तसेच महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांचे औक्षण करून त्यांना आशीर्वाद दिले. मेहकर लोणार मतदार संघातील प्रचाराने आता चांगलाच जोर पकडला असून मतदारसंघात गुलाबी थंडीत प्रचाराने मात्र राजकीय वातावरण चांगलेच गरम होत आहे.पदाधिकारी कार्यकर्ते महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून आणण्यासाठी जीवाचे रान करून संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढत आहेत. पायाला भिंगरी लावल्यासारखी प्रमाणे महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकऱ्ते संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढून दिवस-रात्र एक करीत प्रचारासाठी स्वतःला झोकून दिले आहेत. तर मतदार संघातील मतदाराही महाविकास आघाडीला उत्स्फूर्त पाठिंबा देत असल्याने महाविकास आघाडीने प्रचारात आघाडी घेतली असून मतदार यांच्या आशीर्वाद,महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या बळावर नक्कीच विजय संपादन करू, असा विश्र्वास महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात तथा महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.





### पदाधिकाऱ्यांसह कार्यकऱ्ते व मतदारांची प्रचंड उपस्थिती

महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धाऱ्थ खरात यांच्या प्रचाराऱ्थ आयोजित प्रचार रॅलीला शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि इतर पक्षांचे ज्येष्ठ नेते, जिल्हाध्यक्ष, जिल्हाप्रमुख, उपजिल्हाप्रमुख, जिल्हा परिषद सदस्य, विभाग प्रमुख, उपविभाग प्रमुख, तालुकाध्यक्ष, तालुका प्रमुख, नगरसेवक, नगराध्यक्ष, शहर प्रमुख, शाखाप्रमुख तसेच इतर सर्व पदाधिकारी, युवासेनेचे सर्व पदाधिकारी, अल्पसंख्याक समाजाचे नेते, महिला विकास आघाडीच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मतदारांची प्रचंड मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## विविध वृत्त...

### अजित पवारांना आता भाजपची संगत लागली; रोहित पवार यांची अजित पवार यांच्यावर बोचरी टीका

दैनिक आपला विदर्भ

**भंडारा / प्रतिनिधी:** अजित पवार आता भाजपसोबत गेले आहेत,तर आता ते काहीही बोलतील, अशी बोचरी टीका रोहित पवार यांनी अजित पवार यांच्यावर करीत महायुतीच्या नेत्यांचा समाचार घेतला. यावेळी रोहित पवार पुढे म्हणाले की,भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना वाटत असले की पुढच्या बारा दिवसात महाविकास आघाडीचे सरकार येईल,त्यामुळेच त्यांनी आजच हार मानली आहे. की भाजप काय सत्तेत येत नाही हे त्यांना कळून चुकले आहे. ते काहीही बोलले तरी निर्णय महाविकास आघाडीचे नेते घेणार आहेत, मी स्वत: तरी मुख्यमंत्री पदाचा उमेदवार नाही असा खुलासाही यावेळी त्यांनी केला. तर पहाटे शपथविधीबाबत आता अजित पवार काहीही बोलतील, कारण ते आता भाजपसोबत गेले आहेत. गौतम अदानी यांनाच विचारा मग दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल,महाराष्ट्रातील सऱ्व उद्योग हे गुजरातला जात असून अमित शाह, मोदी गुजरातचे आहेत. त्यांचे गुजरातवर जास्त प्रेम आहे, म्हणून ते गुजरातला जास्त महत्व देत आहेत, अशी टीकाही यावेळी महाविकास आघाडीचे उमदेवार रोहित पवार यांनी केली.



### सख्या भावाने केली लहान भावाची हत्या; आरोपीला केली पुण्यातून अटक

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा / प्रतिनिधी:** प्रॉपर्टीच्या वादातून सख्या भावानेच लहान भावाची हत्या करून बुलढाणा जिल्ह्यातील किनगाव राजा पोलीस स्टेशन हद्दीत खडकपूर्णाच्या नदीपात्रात मृतदेह आणून टाकला होता. घटना उघडकीस येताच बुलढाणा पोलिसांनी तपासचक्र फिरवीत मूर्तकाची ओळख पटवून वाशिम जिल्ह्यामधील रिसोड तालुक्यातील नंढाना येथील आरोपी नंदकिशोर आत्माराम गवळी यास पुणे इथून ताब्यात घेऊन गुन्ह्यात वापरलेली वाहन व हत्यार जप्त केली आहे. तर रघुनाथ आत्माराम गवळी असे मृतकाचे नाव आहे.या भावांमध्ये प्रॉपर्टीच्या वाद सुरू होता. यातूनच हत्या केल्याचे निष्पन्न झाले असून पोलिसांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या अनोळखी पुस्तकाची ओळख पटवून गुन्ह्याचा उकल बुलढाणा पोलिसांनी २४ तासात लावला आहे.



## बुलढाणा हा महायुतीचा गड आहे म्हणून राहूल गांधींनी दौरा टाळला : केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांची टीका

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा / प्रतिनिधी:** बुलढाणा हा महायुतीचा गड आहे,त्यामुळे बुलढाणा येथे जाऊनही काही फायदा होणार नाही आणि आपण जाऊनही पराभूत उमेदवार पहावा लागेल म्हणून राहुल गांधी यांनी बुलढाणा दौरा टाळला असेल, अशी टीका केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली. ते दि.१३ नोव्हेंबररोजी प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, काँग्रेसवाल्यांनी कटेंगे तो बटेंगे चा वेगळा अर्थ काढला असून ते चुकीच्या प्रकाराने प्रचार करत आहे. कटेंगे तो बटेंगे चा असा अर्थ आहे की, आपला भारत एक संघ राहिला पाहिजे. एकजूट राहिला पाहिजे. या देशामधला सर्व जाती धर्माच्या लोकांनी बंधुत्ववाने वागले पाहिजे. त्यामुळे आपला भारत एक संघ राहील. जर आपण आपल्यात विभागलो गेलो तर पाकिस्तान सारखे आपले शत्रुराष्ट्र सीमेवर बसलेले आहे. त्यांच्याकडून आपण कटल्याशिवाय राहणार नाही. म्हणून नरेंद्र मोदींनी तो देश हितासाठी आणि देशाच्या एकजुटीसाठी दिलेला तो नारा आहे. राहुल गांधी आणि राहुल गांधींच्या कार्यकर्त्यांनी संविधानाचा अपमान केला.

फक्त संविधानाचा अपमान केला नाही तर जो संविधान लिहिण्यात ज्यांचा सिंहाचा वाटा होता असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सुद्धा काँग्रेस सत्ता असताना भारतरत्न देऊ शकले नाही तोही व्ही.पी. सिंग पंतप्रधान झाल्यानंतर भारतरत्न मिळाला. एवढेच नाही, तर लोकसभेमध्ये दोनदा जवाहरलाल नेहरूंनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विरोधात प्रचार करून पराभूत केले आहे. म्हणजे संविधान बनवणाऱ्याचा अपमान काँग्रेसने केला आणि संविधानाचा सुद्धा वारंवार अपमान काँग्रेसने केला आहे. जम्मू कश्मीरमध्ये उमर अब्दुल्लांनी शपथ घेतल्यानंतर त्यांच्याच आमदारांनी संविधान शपथ घेऊन ३७० कलम लागू करा हा ठराव त्यांनी पास केला, म्हणजे जम्मू कश्मीरमधून संविधान हद्दपार करा. म्हणून संविधानाचा मागचाही काळात आणि आता सध्याही संविधानाचा अपमान काँग्रेस आणि राहुल गांधी करत आहे. त्याचा पश्र्चाताप म्हणून कदाचित बाबासाहेबांचे संविधान हातात घेऊन फिरत असतील. कदाचित राहुल गांधी यांना वाटले असेल बुलढाणा हा शिवसेना भारतीय जनता पार्टी महायुतीचा गड आहे. जाऊनही काही फायदा होणार नाही आणि मग तिथून आपण जाऊनही पराभूत उमेदवार पहाव लागत असेल म्हणून त्यांनी तो दौरा टाळला असेल,अशी टीका केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली आहे.



## घाटंजी येथे नाना पटोले यांची बॅग तपासण्यात आलेली नाही, असे अधिकाऱ्यांनी केले स्पष्ट

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ / प्रतिनिधी:** विधानसभा निवडणुकीत उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी नेते मंडळींच्या जाहीर सभा होत आहे. आज घाटंजी येथे काँग्रेस उमेदवाराच्या प्रचारासाठी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले सभा होत आहे. पटोले यांचे हेलिकॉप्टर घाटंजी येथे उतरताच निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्याकडे धाव घेतली. नाना पटोले यांच्या बॅग ची तपासणी करण्यात आली, अशी चर्चा सुरू झाली. परंतु, बॅग तपासण्यात आली नाही, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. हेलिकॉप्टरचे व्हिडीओ शूटिंग करण्यात आले आहेत नाना पटोले यांच्याकडे कोणतीही बॅग नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे




### मिस टीन युनिव्हर्स स्पर्धेत भारताचं वर्चस्व, ओडिशाच्या तृष्णा रायनं जिंकला ताज...

**मुंबई / प्रतिनिधी :** २०२४ हे वर्ष भारतासाठी खूप चांगले ठरले आहे. यावर्षी भारतानं जगभरातील सौंदर्य स्पर्धामध्ये आपला दबदबा कायम राखला. यावेळी अनेक स्पर्धामध्ये भारतानं आपले वर्चस्व गाजवले. आता मिस ग्रँड इंटरनॅशनलनंतर, भारताच्या तृष्णा रायनं मिस टीन युनिव्हर्स २०२४चा खिताब जिंकला आहे. आता संपूर्ण जगाच्या नजरा मिस युनिव्हर्स स्पर्धेकडे आहेत, जिथे भारताची रिया सिंघा एक मजबूत स्पर्धक म्हणून पाहिली जात आहे. मिस युनिव्हर्सच्या धर्तीवर दरवर्षी मुलींसाठी मिस टीन युनिव्हर्स स्पर्धा आयोजित केली जाते. यावेळी मिस टीन युनिव्हर्स २०२४ दक्षिण आफ्रिकेतील किम्बर्ले येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत जगभरातील किशोरवयीन सुंदर मुली मिस टीन युनिव्हर्स स्पर्धेत भाग घेतात. आता भारताची तृष्णा राय मिस टीन युनिव्हर्स विजेती झाल्यानंतर अनेकजण तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करत आहेत.

तृष्णा रायला स्पर्धेत मिस टीन युनिव्हर्स इंडियाचा मुकुट देण्यात आला आहे. तृष्णाची मिस टीन युनिव्हर्स स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड करण्यात आल्यानंतर ती खूप आनंदी झाली होती. तृष्णानं मिस टीन युनिव्हर्स २०२४चा खिताब जिंकल्यानंतर जगभरात तिची आता चर्चा होत आहे. तृष्णा राय मूळ ओडिशाची रहिवासी असून तिचे वडील भारतीय सैन्य दलात कर्नल आहेत.

ओडिशाच्या तृष्णा रायनं जिंकला खिताब : कर्नल दिलीप कुमार राय आणि राजश्री राय यांची मुलगी तृष्णाचा ताजपर्यंतचा प्रवास खूप कठिण होता. यासाठी तिनं खूप परिश्रम केले.

## डॉ.राजेंद्र शिंगणे यांना लढत मीच देऊ शकतो : डॉ. शशिकांत खेडेकर

दैनिक आपला विदर्भ

**सिंदखेड राजा / प्रतिनिधी :** मी डॉ.शिंगणे यांना लढत देणारा परंपरागत उमेदवार आहे आणि खऱ्या अर्थाने डॉ.राजेंद्र शिंगणे यांना लढत मीच देऊ शकतो, हे त्यांनाही माहिती होते.असे मत हायुतीमधील शिवसेनेचे उमेदवार डॉ. शशिकांत खेडेकर यांनी व्यक्त केले. यावेळे डॉ.शशिकांत खेडेकर म्हणाले की, सिंदखेड राजा मतदार संघात मतदारांचा अतिशय चांगला प्रतिसाद आहे, आणि हा प्रतिसाद एकदम मिळत नसतो, २०१९ ची निवडणूक हरल्यानंतर पाचही वर्ष लोकांच्या संपर्कात राहिलो, सुख दुःखात सहभागी झालो आणि जेव्हापासून एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले तेव्हापासून भूतो ना भविष्य ते जवळपास साडेचारशे कोटी रुपयांचे निधी मतदार संघात आणून विकास कामे केली आहेत. सिंदखेडराजा मतदार संघाचा विकास डॉ.शशिकांत खेडेकर करू शकतात, त्या विकास कामाच्या भरोशावर मला पूर्ण विश्र्वास आहे.पुनश्र्च विजय मला मिळाल्याशिवाय राहणार नाही, असा विश्र्वासही यावेळी त्यांनी व्यक्त केला. महायुतीचा अधिकृत उमेदवार मी आहे, एक महिन्यापूर्वी मुख्यमंत्र्यांनी मला स्पष्ट सांगितले होते की, डॉ.राजेंद्र शिंगणे तुतारीकडे गेलेले आहेत. त्यामुळे युतीमध्ये हा मतदारसंघ आपल्याला सुटलेला आहे आणि आता तुम्ही कामाला लागा, एक महिन्यापूर्वीच मुख्यमंत्र्यांनी मला याची कल्पना दिली होती. मतदारांनाही माहित आहे की मी परंपरागत लढत देणारा उमेदवार आहे आणि खऱ्या अर्थाने डॉ. राजेंद्र शिंगणे यांना लढत मीच देऊ शकतो, हे त्यांनाही माहिती होते. ज्याप्रमाणे २०१९ मध्ये माझ्या मतांमध्ये विभागणी झाली. तशीच विभागणी २०२४ च्या विधानसभेमध्ये करण्याच्या दृष्टिकोनातून आपलीच काही मंडळी राष्ट्रवादीमध्ये ठेवली आणि त्यांच्या माध्यमातून त्यांनी हा एक कँडिडेट बळीचा बकरा केला आहे.अशी टीका सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघाचे हायुतीमधील शिवसेनेचे उमेदवार डॉ. शशिकांत खेडेकर यांनी केली.

